# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्राव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र.रातुमनावि/म.वि.वि./३६८ दिनांक:–१६.०५.२०१८.

प्रति,

प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित/संचालीत महाविद्यालये व
विद्यापीठाचे पदव्यूतर विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

महोदय,

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या वतीने बृहत आराखडा तयार करण्याचे काम सद्या सुरु आहे. या बाबतीत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यापीठाच्या विविध विभागातील विभाग प्रमुखांना प्रश्नावली भरुन पाठविण्याची विनंती करण्यात आली होती. प्राप्त माहितीची पाहणी करण्यात आल्यानंतर प्राचार्य/विद्यापीठ विभाग प्रमुखांमार्फत मिळणारा प्रतिसाद मोठया प्रमाणावर मिळणे अपेक्षित होते. परंतु संलग्नित महाविद्यालयांची/विद्यापीठ विभागाची संख्या लक्षात घेता प्राप्त झालेला प्रतिसाद फारसा प्रोत्साहनात्मक नसल्याने प्राचार्यांना/विद्यापीठ विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावरोल विविध प्रश्नावली आपण जास्तीत जास्त संख्येने भरुन पाठविण्यात यावी. आपल्या महाविद्यालयात/विभागात शिकणारे विद्यार्थी त्यांचे पालक तसेच आपल्या महाविद्यालयाचे संचालक यांच्याकडुन देखील प्रतिसाद प्राप्त हाणे अपेक्षित आहे.

या पत्राद्वारे आपणांस पुन:श्च विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शिक्षणाच्या लाभधारकांकडुन विद्यापीठामार्फत प्राप्त होणाऱ्या प्रश्नावली ताबडतोब ऑनलाईन पाठविण्यात यावे. प्रश्नावली पाठविणाऱ्या प्राचार्य/पालक/संस्थाचालक/विद्यापीठ विभाग प्रमख यांचा अल्प प्रतिसाद लक्षात घेता आपण ही प्रश्नावली जास्तीत जास्त लाभधारकांकडुन भरुन दिनांक २० मे, २०१८ पूर्वी पाठवावी.

बहत आराखडा समिती
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ